RNI No. MAHBIL/064/13/1/2012
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक - नाशिक विभाग

वर्ष - ९, अंक - २ ] शुक्रवार, ऑक्टोबर २३, २०२० / कार्तिक १, शके १९४२ [ पृष्ठे ०३

## असाधारण क्रमांक २

## प्राधिकृत प्रकाशन

**उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांजकडून**

**महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित,**
८ वा मजला, सेंटर १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ अन्वये**

**अधिसूचना**

क्रमांक म.वि.वि.कं./नियोजन/शिर्डी-४७/२२१३/२०२०.– ज्याअर्थी, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित (यापुढे जिचा उल्लेख "म. वि. वि. कं" असा करण्यात आला आहे) ही कंपनी, कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये संस्थापित झाली आहे व महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखाली कार्य करीत आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र क्रमांक ३७) (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ४० च्या, पोट-कलम १ *(ब)* अन्वये, म. वि. वि. कंपनीस अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील काकडी; संगमनेर तालुक्यातील वडझरी खुर्द व राहाता तालुक्यातील केळवद इत्यादी गावातील ३५०.८५ हेक्टर अधिसूचित क्षेत्रासाठी शासन अधिसूचना क्रमांक टीपीएस-१६०८/२६६२/प्र. क्र.- १११/०९/ युडी-९, दिनांक २८ मे २००९, टीपीएस-१६१७/३७६/प्र. क्र.- २७७/२०१८/युडी-९, दिनांक २२ नोव्हेंबर २०१८ आणि त्याचे शुद्धिपत्रक दिनांक ११ जानेवारी २०१९ अन्वये "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्त केले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ४० च्या पोट-कलम *(३)* च्या खंड *(ड)* द्वारे समाविष्ट केलेल्या कलम ११५ च्या पोट-कलम *(२)* मधील तरतुदींचे पालन करून म. वि. वि. कंपनीने उक्त अधिसूचित क्षेत्रात सर्वेक्षण करून विद्यमान भू-वापर नकाशा तयार केला आणि त्यानुसार म. वि. वि. कंपनीच्या अखत्यारीत असलेल्या क्षेत्राच्या विकासासाठी प्रारूप प्रस्ताव तयार करण्यात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, म. वि. वि. कंपनीने शासनाकडे प्रारूप नियोजन प्रस्ताव व विकास नियंत्रण नियमावली सादर केली आणि त्यानुसार शासनाने निर्णय क्रमांक डीटीपी/प्र. क्र. ४४०/टीपीव्ही-४/२०१९/३९१६, दिनांक ३ ऑगस्ट २०१९ अन्वये शिर्डी विमानतळ अधिसूचित क्षेत्राच्या एकूण ३५०.८५ हेक्टर एवढ्या क्षेत्रापैकी २९८.३१ हेक्टर एवढ्या क्षेत्राच्या नियोजन प्रस्ताव व विकास नियंत्रण नियमावलीस मंजुरी दिलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ४० च्या पोट-कलम *(३)* च्या खंड *(ड)* द्वारे समाविष्ट केलेल्या कलम ११५ च्या पोट-कलम *(२)* मधील तरतुदींचे पालन करून म. वि. वि. कंपनीने शिर्डी विमानतळ अधिसूचित क्षेत्र, शिर्डी येथील उर्वरित ५२.५४ हेक्टर क्षेत्राचा (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त क्षेत्र" असा करण्यात आला आहे) प्रारूप नियोजन प्रस्ताव तयार केला आहे. यापूर्वी मंजूर झालेल्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या संचालक मंडळामार्फत त्यांच्या ७१ व्या बैठकीत झालेल्या ठरावाद्वारे शिर्डी विमानतळ अधिसूचित क्षेत्राच्या एकूण ३५०.८५ हेक्टर क्षेत्रापैकी उर्वरित ५२.५४ हेक्टर क्षेत्राचा प्रारूप नियोजन प्रस्ताव, उक्त अधिनियमाच्या कलम ४० च्या पोट-कलम *(३)* च्या खंड *(ड)* द्वारे समाविष्ट केलेल्या कलम ११५ च्या पोट-कलम *(२)* अन्वये प्रसिद्ध करण्यासाठी व शासनास सादर करण्यासाठी मान्यता दिलेली आहे ;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम ४० च्या पोट-कलम *(३)* च्या खंड *(ड)* द्वारे समाविष्ट केलेल्या कलम ११५ च्या पोट-कलम *(२)* द्वारे उक्त क्षेत्राचा प्रारूप नियोजन प्रस्ताव जनतेच्या माहितीसाठी आणि महाराष्ट्र शासन राजपत्रात ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत त्यावर हरकती व सूचना मागविण्यासाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहेत. हरकती व सूचना असतील तर त्या उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांच्याकडे लेखी स्वरूपात व उपरोक्त पत्त्यावर विनिर्दिष्ट कालावधीत पोहोचतील अशा रितीने पाठविण्यात याव्यात. सदर प्रस्ताव संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे मान्यतेसाठी पाठविण्यापूर्वी मुदतीत (विहित) प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर उक्त अधिनियमाच्या कलम ४०, पोट-कलम *(३)* च्या खंड *(ड)* द्वारे दाखल केलेल्या, कलम ११५ च्या पोट-कलम *(३)* मध्ये तरतुदीनुसार यथायोग्य कार्यवाही करण्यात येईल.

वरील प्रारूप नियोजन प्रस्तावाची प्रत जनतेच्या माहितीसाठी खालील ठिकाणी उपलब्ध राहील.

१. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि. मुंबई, ८ वा मजला, सेंटर-१, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.

२. शिर्डी विमानतळ, काकडी, तालुका कोपरगाव, जिल्हा अहमदनगर - ४२३ १०७.

३. सहायक संचालक, नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, टी. व्ही सेंटरजवळ, सावित्रीबाई फुले संकुलन, सावेडी, अहमदनगर- ४१४ ००३.

४. मुख्य अधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर - ४२३ १०७.

संचालक मंडळ म. वि. वि. कं. यांच्या आदेशानुसार,

**दिपक कपूर,**
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित.

मुंबई, १९ ऑक्टोबर २०२०.

---

**MAHARASHTRA AIRPORT DEVELOPMENT COMPANY LIMITED**

8th Floor, Centre 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. Act XXXVII of 1966)**

**Notification**

No. MADC/PLG/Shirdi-47/2213/2020.– Whereas, the Maharashtra Airport Development Company Limited (hereinafter referred to "MADC") is a Company incorporated under the Companies Act, 1956 and functions under the superintendence and control of the Government of Maharashtra ;

and whereas, Government of Maharashtra in Urban Development Department has in exercise of its power conferred under sub-section *(1-B)* of Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act"), appointed MADC to be the Special Planning Authority for the notified area of Shirdi Airport area; admeasuring 350.85 hectares comprising area from villages of Kakdi, taluka Kopargaon; Wadzari Khurd, taluka Sangamner and Kelwad, taluka Rahata, district Ahmednagar *vide* Government Notification Nos. TPS-1608/2662/CR-111/09/UD-9, dated 28th May 2009, TPS-1617/376/CR-277/2018/UD-9, dated 22nd November 2018 read with Corrigendum, dated 11th January 2019 ;

and whereas, MADC, had in accordance with sub-section *(2)* of Section 115 as substituted by Clause *(d)* of sub-section *(3)* of Section 40 of the said Act carried out survey of the aforesaid notified area and prepared the existing land use map and accordingly prepared the Draft Proposal for the development of land within its jurisdiction ;

and whereas, MADC has submitted the Draft Planning Proposals and Development Control Regulations to the Government and accordingly, Government has approved Planning Proposals and Development Control Regulations for an area of about 298.31 hectares out of total area of 350.85 hectares of Shirdi Airport Notified area *vide* GR No. DTP/CR-440/TPV-4/2019/3916, dated 3rd August 2019 ;

and whereas, MADC, had in accordance with sub-section *(2)* of Section 115 as substituted by Clause (d) of sub-section *(3)* of Section 40 of the said Act, prepared Draft Planning Proposal of the remaining area of 52.54 hectares of Shirdi Airport Notified area, Shirdi (hereinafter referred to as "the said area") keeping the previously approved Development Control Regulations unchanged ;

and whereas, the Board of Directors of MADC, in it's 71st Board Meeting held on 25th February 2020 has given the approval for publishing the Draft Planning Proposal of remaining area of 52.54 hectares out of total area of 350.85 hectares of Shirdi Airport Notified area in accordance with sub-section *(2)* of Section 115 as substituted by Çlause *(d)* of sub-section *(3)* of Section 40 of the said Act and submitting it to the Government after following the due process under the said Act.

Now therefore, as required by sub-section *(2)* of Section 115 as substituted by Clause *(d)* of sub-section *(3)* of Section 40 of the said Act, the Draft Planning Proposal for the said area, is hereby published, for information and inviting suggestions and objections thereto from the public within a period of 30 days from the date of publication of this Notice in the Maharashtra Government Gazette. The suggestions and objections, if any, will be sent in writing and addressed to Vice Chairman and Managing Director, MADC Ltd., on the above address, so as to reach within stipulated period. The suggestions/ objections received during stipulated period will be duly processed in accordance with the law embodied in sub-section *(3)* of Section 115 as substituted by clause *(d)* of sub-section *(3)* of Section 40 of the said Act, before submitting the proposal to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune for approval.

A Copy of above Draft Planning Proposals is kept open for inspection of the public at following offices.

(1) Maharashtra Airport Development Company Limited, Mumbai, 8th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai- 400 005.

(2) Shirdi Airport, Kakadi Village, taluka Kopargaon, Ahmednagar - 423 107.

(3) Assistant Director, Town Planning and Valuation Department, Near T. V. Centre, Savitribai Phule Sankulan, Savedi, Ahmednagar- 414 003.

(4) Chief Officer, Shirdi Municipal Council, Shirdi, taluka Rahata, district Ahmednagar- 423 107.

*By Order of the Board of Directors, MADC.*

**DEEPAK KAPOOR,**

Vice Chairman and Managing Director,
Maharashtra Airport Development Company Limited.

Mumbai, 19th October 2020.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.